विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

महाराष्ट्र शासन

w'site : www.dydepune.com
e-mail: 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

15 JUL 2020
3378

# पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०२०-२१

---

## प्रसिध्दी निवेदन-०४/२०२०
## दि.१५.०७.२०२०

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७, दि.०७.०३.२०१९ व दि.२३.०६.२०२० अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे संकेतस्थळ https://pune.11thadmission.org.in/ आहे.

या कार्यालयाचे दि.०१.०७.२०२० च्या प्रसिध्दी निवेदनानुसार इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे संभाव्य वेळापत्रक जाहिर करण्यात आलेले होते. परंतु करोना विषाणू अर्थात कोवीड-१९ चा प्रादुर्भाव कमी करणेसाठी प्रतिबंधात्मक उपयोजना म्हणून मुंबई, पुणे तसेच राज्यातील इतर काही भागांमध्ये पुन्हा लॉकडाऊन/टाळेबंदी जाहीर करणेत आलेली आहे, तसचे मार्गदर्शन केंद्र/माध्यमिक शाळांना/ विद्यार्थी व पालक यांना सविस्तर प्रशिक्षण देणे आवश्यक असल्यामुळे मा. शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांच्या दि.१४.०७.२०२० पत्रान्वये सुधारित वेळापत्रक जाहिर करण्यात आलेले आहे.

विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी अडवणी येऊ नयेत, आवश्यक कागदपत्रे मिळविता यावीत यासाठी यापुर्वी जाहीर केलेल्या संभाव्य वेळापत्रकामध्ये अंशतः बदल करुन सुधारित वेळापत्रकाद्वारे जाहिर करणेत येत आहे.

### सुधारित वेळापत्रक

| क्र | कार्यवाहीचे टप्पे | कालावधी | संबधित स्तर |
|---|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयांची संकेतस्थळावर नोंदणी | दि.२२ जुलै २०२० | मुख्याध्यापक/प्राचार्य, शाळा/कनिष्ठ महाविद्यालये |
| २ | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदविलेली माहिती तपासणी करुन ऑनलाईन अंतिम करणे. | दि.२४ जुलै २०२० पर्यंत | विभागीय शिक्षण उपसंचालक |
| ३ | इ.११ वी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करणे, अर्ज भाग-१ भरणे व अर्जातील माहिती प्रमाणित करणेसाठी शाळा/मार्गदर्शन केंद्र निवडणे आणि आपला अर्ज अॅप्रुव्ह झाला आहे याची खात्री करणे | दि. २६ जुलै २०२० पासून | विद्यार्थी स्वतः पालकांच्या मदतीने |
| ४ | विद्यार्थी प्रवेश अर्जातील माहिती भाग-१ ऑनलाईन तपासून अॅप्रुव्ह करणे आवश्यकता असल्यास विद्यार्थ्यांशी दुरध्वनीवरुन संपर्क साधणे. | दि.२७ जुलै २०२० पासून | संबधित मार्गदर्शन केंद्र/ शाळा/महाविद्यालये |
| ५ | विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-२ (प्रवेशासाठी पसंतीक्रम) नोंदविणे व सबमिट / लॉक करणे) नवीन अर्ज भाग-१ सुध्दा भरता येईल. | महाराष्ट्र राज्य मंडळाची इ.१० वी परीक्षेचा निकाल जाहीर झालेनंतर घोषीत करण्यात येईल. | विद्यार्थी स्वतः पालकांच्या मदतीने ०२०२६११४७१५ |

Scanned with CamScanner

| क्र | कार्यवाहीचे टप्पे | कालावधी | संबधित स्तर |
|---|---|---|---|
| सराव | विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याचा सराव करणेसाठी तात्पुरते प्रारुप संकेतस्थळ सुविधा देण्यात येत आहे. त्यामध्ये भरलेल्या माहिती दि.२४ जुलै २०२० नंतर नष्ट करण्यात येईल. | दि.१६ जुलै २०२० पासून दि.२४ जुलै २०२० पर्यंत (केवळ सरावासाठी) संकेतस्थळावर Mock.Demo.Registration तपासा | प्रत्यक्ष अर्ज भरण्यासाठी नंतर नव्याने नोंदणी करावी लागेल |

**विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्याचा सराव करणेसाठी विशेष सुविधाः-**

विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना अडचणींना सामोरे जावे लागू नये, त्यांना अर्ज भरण्याचा सराव करता यावा, मूळ अर्ज भरतांना चुका होऊ नयेत. यासाठी दरम्यानच्या कालावधीत संकेतस्थळावर विद्यार्थ्यांसाठी प्रारुप लॉगीन सुविधा देण्यात येत आहे. सदर सुविधेद्वारे विद्यार्थ्यांनी अर्ज भरणेचा सराव करावा. प्रत्यक्षात अर्ज भरण्यास सुरुवात होणेपुर्वी सदर भरलेली माहिती नष्ट करुन मुळ संकेतस्थळावर नव्याने अर्ज भरण्याची सुविधा त्यांना देण्यात येईल.

**विद्यार्थ्यांसाठी मूळ संकेतस्थळावर प्रत्यक्ष अर्ज भरणेची सुविधा दि.२६/०७/२०२० पासून सुरु होईल.**

यापुढील प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक यथावकाश जाहीर करणेत येईल.

**दक्षता घ्या, सुरक्षित राहा.**

**सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या www.dydepune.com व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या https://pune.11thadmission.org.in/ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**(मीना शेंडकर)**
**सचिव,**
**इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती**
**तथा**
**सहा.शिक्षण संचालक,**
**पुणे विभाग पुणे-१**

Scanned with CamScanner